ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce, Education, Law and Language

Monthly Peer Reviewed International Research Journal

Special Issue March-2015




Chief Editor - Prof. Virag S. Gawande

Editor - Dr. Sanjay J. Kothari

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

Scanned with CamScanner

R.N.I- MAH-R-38527

I S S N- 2278-9308

# Sanshodhan Samiksha

**Humanities,Social Sciences,Commerce, Education, and language& Law**

Monthly Peer Reviewed International Research Journal

**Special Issue March - 2015**

**Chief Editor**

**Prof.Virag S.Gawande**

**Editor**

**Dr. Dinesh W.Nichat**

**Commerce**

**Editor**

**Dr.Sanjay j. Kothari**

**Social Sciences**

**Published By**

Aadhar Publication – Amravati

( M.S.) India 444604

Scanned with CamScanner

# INDEX

## SECTION (A) - ENGLISH



| | Author | Title of Research Paper | Pg.No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. विलास माणिकराव गायकवाड | ग्रामीण समाजातील वृद्धांच्या समस्यांचा सामाजशास्त्रीय अभ्यास | 1 |
| 2 | प्रा.झरेकर रमेश सोनू | इतिहास आणि मानसशास्त्र संबंध एक चिकित्सक अभ्यास | 6 |
| 3 | प्रा.अनिल प्रभाकर निकम | नाझी वादाचा उदय आणि सामाजिकस्थिती | 9 |
| 4 | प्रा.बाळकृष्ण कारु रामटेके | आदिवासी विकासात गैरशासकीय संघटनांची भूमिका | 13 |
| 5 | प्रा. आरती डी. महेशकर | नविन आर्थीक धोरणाचा भारताच्या कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम | 18 |
| 6 | प्रा. ए. जी. वानखडे | भारतातील दारिद्र्याचा विविध समित्यांनी केलेला अभ्यास : एक दृष्टीक्षेप | 20 |
| 7 | प्रा. संगिता अरमरकर | वित्तीय समावेशनात रिझर्व्ह बँकेचा पुढाकार | 24 |
| 8 | प्रा. दिनेश भा. खेरडे | अधिकोषण क्षेत्रात करण्यात आलेल्या आधुनिक सुधारणा | 27 |
| 9 | डॉ. वसंत दामोधर सपकाळ | ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेले विचार | 30 |
| 10 | प्रा.डॉ.गुंफा पाटीलबा कोकाटे | स्त्रीवादी चळवळीचा विचारप्रवाह | 33 |
| 11 | प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण | भटक्यांच्या स्वकथनातील सामाजिक वास्तव | 37 |
| 12 | प्रा. अशोक स. ढोके | भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारे घटक | 42 |
| 13 | डॉ. सौ. अपर्णा देशपांडे | अन्न पदार्थाचे पोषण मुल्य वाढविण्यासाठी प्रक्रिया | 45 |
| 14 | जयंत मनोहरराव थूल | भारत में निर्धनता की वास्तविकता | 48 |
| 15 | डॉ. अशोक भिमराज शिंदे | ज्ञानराज माझी योग्याची माऊली | 52 |
| 16 | चिन्मय प्रकाश दाते | यवतमाळ जिल्ह्यातील स्त्री व पुरुष कामगार लोकसंख्येत झालेला बदल | 56 |
| 17 | प्रा. एम. एल. भुसारे | आदय समाजसुधारक संत श्री चक्रधरस्वामी यांची राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मते विषयीचे विचार : एक अभ्यास | 58 |
| 18 | प्रा. लखपती वा. गायकवाड | आजच्या युवकांसाठी ! | 62 |
| 19 | प्रा. डॉ. हेमंत मिसाळ | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान | 66 |
| 20 | प्रा.एस.बी.पाते<br>वसंत नानाराव पतंगे | भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणूक : संधी आणि समस्या | 69 |



Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

# भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशीगुंतवणूक ः संधी आणि समस्या

मार्गदर्शक
डॉ. एस. बी पाते
संत तुकाराम महाविद्यालय
परभणी

संशोधक
वसंत नानाराव पतंगे
अ. र. भा. गरूड महाविद्यालय
शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगांव

**प्रस्तावना ः**

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा त्या देशाकडे असर्णाया भांडवल उपलब्धतेवरून होते. भारत अनेक वर्ष इंग्रजांच्या जोरवडात राहीला. इंग्लंडने भारतातील संपत्ती मोठया प्रमाणात आपल्या देशात नेली. भारतातील हस्तोद्योग़कुटीरउद्योग़बंद होतील अशी धोरणे राबवून ती उद्योग बंद पडली. भारतीय अर्थव्यवस्थेला इंग्लडने पार रसातळाला नेले व इंग्लंडचा विकास साध्य केला. जगातील प्रत्येक देशाला विकासाच्या प्रारंभीक अवस्थेत भांडवलाची मोठया प्रमाणात गरज भासते. ती गरज प्रत्येक विकसीत देशाने कोणत्या तरीइतर देशांकडून पूर्ण केली. या विकसीत देशांनी त्यांचा आर्थिक विकास विदेशी भांडवलाच्या मदतीने वेगाने घडवून आणला. त्यामुळे त्यांच्या उत्पादनात व्यापारात वाढ होऊन उत्पादन वाढ झाली. त्यामुळे बचतीत वाढ झाली यातून देशाची गरज भागवून बरेच भांडवल शिल्लक राहू लागले. ते भांडवल या देशांनीअविकसीत देशांत गुंतवायला सुरूवात केली आणि त्यातून अनेक देशांच्या विकासाला हातभार लागत आहे व अनेक देशांना लाभांश व्याज मिळत आहे.

भारताने स्वातंत्र्याप्राप्ती नंतर नियोजऩ औद्यागिक धोरण़ व्यापार धोरण राबवूनआर्थिक विकास कसा साधता येईल यासाठी प्रयत्न केले आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही सुरूवातीपासून भांडवलाच्या समस्येने ग्रासली आहे. भारतात एकीकडे भांडवलाची समस्या तर दुसरीकडेबेरोजगारी दारिद्र अन्नधान्याची टंचाइ्रपायाभुत सुविधांचा अभाव इ. समस्या होत्या. भारताने संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केलापण भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात सार्वजनिक अर्थव्यवस्थेकडेअधिक झुकलेली होती. त्यामुळेसुरूवातीला भारताने विदेशी भांडवलाला अधिक संधी उपलब्धकरून दिल्या नाही. गॅट़ आय. एम. एफ. जागतीक बॅक व वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार यामुळे अनेक देश बंदीस्त अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकड़े संमिश्रअर्थव्यवस्थेकडूनमुक्त अर्थव्यवस्थेकडे जाऊ लागले त्याला भारत ही अपवाद नव्हता. भारताने हळूहळू जागतिक बदल स्विकारायला सुरूवात केली आणि १९९१ पासुन भारताने जागतिकीकरण़ उदारीकरण आणि खाजगीकरण या धोरणांचा स्विकार केला व भारतीय अर्थव्यवस्था संमिश्र अर्थ व्यवस्थेकडून भांडवलशाहीकडे झुकायला सुरूवात झाली. भारताने १९९१ पासून मुक्त अर्थव्यवस्थेचा टप्याटप्याने स्विकार केला आणि भारतात विदेशी गुंतवणूकीचे नवे पर्व सुरू झाले. चीन सारख्या कट्टरसाम्यवादी असर्णाया देशाने देखील विदेशी भांडवलाचे स्वागत करून आपला विकास साध्य केला.

प्रस्तूत शोध निबंधात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रावर होणाá्या परिणामांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश ः**

१. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा अर्थ समजून घेणे.
२. भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह अभ्यासणे.
३. प्रत्यक्ष विदेशीगुंतवणीची संधी जाणून घेणे.
४. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या किरकोळ व्यापार क्षेत्रातील परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती ः**

प्रस्तूत संशोधनाकरीता पूर्णपणे द्वितीय स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रा ः**



Scanned with CamScanner

किरकोळव्यापार क्षेत्रा हे भारतीय अर्थव्यवस्थेचाप्रमुख आधारस्तंभ आहे. जागतिक बॅंकेच्या अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था २००५ मध्ये जगातिल दहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होती. मात्रा त्यानंतर वेगानेप्रगती करीतक्रयशक्तीच्या बाबतीत ती २०११ मध्ये तिसर्‍या क्रमांकावर पोहचली आहेअसे जागतिक बॅंकेच्यानुकत्याच २०१४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालात नमुद करण्यात आले आहे. जागतिकबॅंकेने अर्थव्यवस्थेच्या जागतिक तुलनात्मककार्य क्रमांर्गत एकुण १९९ देशांच्या अर्थव्यवस्थांची तुलना करून हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. जागतिक बॅंकेच्या या नव्या आकडेवारीनुसार अमेरीका व चीनया देशांचा नंतर भारताने२००५ ते २०११ या काळात जपानला मागे टाकतक्रयशक्तीच्या बाबतीत जगातील तिर्सया सर्वात मोठया अर्थव्यवस्थेचा मान मिळवला आहे. क्रयशक्तीचा विचार करता जगाच्या एकुण उत्पन्नात भारताचा वाटा २०११ मध्ये ६.४ट होता. जपान आणि द. कोरीया हे देश सोडल्यास आशियाच्या अर्थव्यवस्थेत दोनतृतीयांश वाटा भारत आणि चीनचा आहे. जगातीलउदयोन्मुख बाजारपेठांचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्था आघाडीची अर्थव्यवस्था आहे. भारताची लोकसंख्या सतत वाढत आहे म्हणजेच भारतात उपभोक्ता वर्ग ही सतत वेगाने वाढत आहे. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष भारतीय बाजार पेठेवर आहे. विकसीत देशांत चांगला नफा देर्णाया गुंतवणूकीच्या संधी किरकोळ व्यापार क्षेत्रात कमी आहेत. भारतात मात्रा या संधी अधिकाधीक निर्मान होत आहेतवविकसित देशांना आपल्याकडे आकर्षित करीत आहेत. पत मानांकन करर्णाया अनेक संस्थांनी भारताच्या किरकोळ व्यापार क्षेत्राला स्थिर बाजारपेठेचा दर्जा दिला आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नह्यद्ध किरकोळव्यापार क्षेत्राचे योगदान १४ ते १५ट आहे. भारतात सुमारे १ कोटी ५० लाख किरकोळ व्यापारी आहेत. भविष्यात भारतात वेगाने वाढर्णाया क्षेत्रात किरकोळ व्यापार क्षेत्रा आघाडीवर असणार आहे. देशातरोजगाराच्यासंधी किरकोळ क्षेत्रात अधिकाधीक निर्माण होत आहेत. भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राची वाढ होण्याची अनेक कारने आहेत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात दरडोई उत्पन्नात वाढ होत आहे. भारतातील मध्यमवर्गीयांच्या उत्पन्नात वेगाने वाढ होत आहे त्यामुळे त्यांची क्रयशक्ती वाढली आहे. त्यामुळे उपभोग्य व चैनिच्या वस्तूवरील खर्च वाढला आहे. जागतिकीकरनामुळेसर्व देश जवळ आले आहेतव्यापाराच्या माध्यमातून केवळ वस्तू व सेवांचीच देवाणघेवाण होत नाही तर त्यातून सांस्कृतीक देवाणघेवाण ही होत आहे. भारतातील राहणीमाणाचा दर्जा उंचावतआहे. पाश्चिमात्य देशांच अनुकरण ही आपल्या देशात केले जात आहे. यामुळे विदेशी वस्तूंची मागणी वाढत आहे. भारतात तरूण वर्गा ची संख्या ही जास्त आहे त्यामुळे त्यांची खरेदीहै जास्तआहे. भारतात कोटयाधिशांची संख्या सुद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आरामदायी चैनिच्या वस्तूंची मागणी ही वाढत आहे. भारतात ग्रामिण भागात आणि शहरी भागात ही किरकोळ व्यापार क्षेत्रा विस्तार करण्याच्या खुप संधी आहेत. भारतात किरकोळ क्षेत्रा संघटीतव असंघटीत अशा दोन गटातविभागलेले आहे. भारतात किरकोळ क्षेत्रा हे अधिकाधिक परंपरेने चालवले जात आहे. भारतात किरकोळ क्षेत्रातील गुंतवणूक कमी आहे व त्यांना बॅंकाकडून अधिक प्रमाणात कर्ज ही उपलब्धहोत नाही त्यामुळे या क्षेत्राचा फारसा विकास झाला नाही. ग्रामिण भागात तर विविध प्रकारच्या व गुणवत्तापुर्ण वस्तू ही उपलब्ध होत नाही.

**भारतात किरकोळ व्यापार क्षेत्रातील संधी ः**

भारतात किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीला मोठी संधी आहे व ही संधी त्यांना मिळाल्यास ते संधीच सोन करतील. भारतात किरकोळ व्यापार क्षेत्रातील गुंतवणूक कमी आहे. मध्यस्थांची मोठीसाखळी या व्यवसायात आहे ही साखळी या गुंतवणूकीमुळे संपुष्टात येईल. मॉल्स भारतात आल्यास एकाच छाताखाली अनेक वस्तू ग्रहकांना उपलब्ध होतील त्यामुळे ग्राहक त्याकडे आकर्षीत होतील वाढती लोकसंख्या भारतातील वाढते दरडोई उत्पन्न मध्यमवर्गीयांचे वाढते उत्पन्न गुंतवणीकीची सुरक्षितता स्थानिक क्षेत्राची कमी स्पर्धा इ. अनेक कारणांमुळे भारतात विदेशी गुंतवकीला मोठी संधी आहे. बदलती जिवनशैली पाश्चात्य देशांच अनुकरण त्यामुळे विदेशी वस्तुची वाढती मागणी हे घटक विदेशी गुंतवणूकीला अधिकाधिक संधी निर्माण करून देतील.

**प्रत्यक्षविदेशी गुंतवणूक ः**

जेव्हाविकसित देशातील मोटया व बहूराष्ट्रीय कंपन्या विकसनशील आणि अविकसीत देशातील कंपन्यांचे भाग भांडवल खरेदी करून व्यवस्थापनाचा ताबा मिळवितात किंवा नव्याने कंपनी सुरून दीर्घकालीन भांडवली गुंतवनूक करतात तेव्हा तिला थेट किंवा प्रत्यक्ष विदेशीगुंतवणूक म्हणतात. ही गुंतवणूक नफ्याने प्रेरीत असते. थेट विदेशी



Scanned with CamScanner

गुंतवणूकीचा उद्देश इतर देशांच्या बाजारपेठा मिळविणे जास्तीत जास्त नफा मिळविने हा असला तरी ही गुंतवणूक ज्या देशांमध्ये केली जाते. त्या देशाला विदेशी चलनाची प्राप्ती होतेभांडवल उपलब्ध होतेनिर्यात वाढते रोजगार वाढते व देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. विदेशी गुंतवणुक आपल्याच देशात यावी यासाठी अनेक देश या विदेशी गुंतवणूकीला अनेक सोयी सवलती देत आहेत त्यांना गुंतवणूक सुरक्षिततेची हमी देत आहेत. विदेशी गुंतवणूक आपल्या देशात यावी यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. थेट विदेशी गुंतवणूकीच्या माध्यमातून विकसीत देशातील उद्योजकांनाविकसनशील देशातील बाजारपेठेत प्रवेश करता येतो तर विकसनशील देशातील उद्योजकांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश करता येतो यातून जागतिक व्यापारात वाढ घडून येते.

**रिटेल मधील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे फायदे ः**

किरकोळ व्यापार क्षेत्राात गुंतवणूक झाल्यास त्याचे अनेक फायदे भारतीय अर्थव्यवस्थेला होतील. किरकोळ विदेशी क्षेत्राात थेट विदेशी गुंतवणूकीमुळे उपभोक्ते शेतकरी बाजारपेठा अशा सर्व घटकांना फायदे होतील असे म्हटले जात आहे.

1. **बेरोजगारी कमी करण्यस मदत ः**

बेरोजगारी ही भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठी समस्या आहे ही बेरोजगारी किरकोळ क्षेत्रातील विदेशी गुंतवणूकीमुळे कमी होईल. किरकोळ व्यापार क्षेत्राात थेट विदेशी गुंतवणूक आल्यास अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. कुशल व अकुशल असणाया अनेक लोकांना या क्षेत्रातील मोठया कंपनीने २० लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. अशा मोठया कंपन्या भारतात आल्यास लाखो लोकांना या कंपन्यातरोजगार उपलब्ध होई ल. भारतात रिलायन्सव इतरही मॉल्स् रोजगाराच्या अनेक संधी उपलब्धकरून देत आहेत.

2. **पायाभुत सुविधांत वाढः**

भारत फळांच्या उत्पादनात फुलांच्या उत्पादनात आघाडीवर आहे भारतात भाजीपाल्यांच उत्पादन देखील मोठया प्रमाणात होते. पण या सर्व उत्पादनासाठी वातानुकूलीत साठवणूक गृहांची आवश्यकता असते. ती सुविधा भारतात अल्पप्रमाणात उपलब्ध असल्यामुळे नाशवंत वस्तू अधिक काळ साठवता येत नाहीत. त्यामुळे त्या वस्तू बाजारपेठे पर्यत पोहचत नाहीत किंवा पोहचल्यास त्यांची गुणवत्ता टिकून राहत नाही. विदेशी गुंतवणूक आल्यास या सुविधा निर्माण होतील. भारतात ग्रामिण भागातून शहरी भागांकडे व शहरांतून ग्रामिण भागांकडे वस्तू पोहचवर्णाया वहतूकीच्या सुविधा कमी प्रमाणात उपलब्धआहेत. त्या सुविधा विदेशी गुंतवणूकीमुळे निर्माण होतील. वस्तूची गुणवत्ता मालाची प्रतवारी साठवणूक पॅकींग अशा सर्व बाबींमुळे सुधारणा घडून येईल.

3. **शेतर्कयांना फायदाः**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. या कृषीप्रधान अर्धव्यवस्थेत कृषकालाआत्महत्या करण्याची वेळ आली आहे. शेती हा व्यवसाय बहूतेकांना नकोसा झालाय केवळ मजबूरी म्हणून अनेक लोक शेती करीत आहेत. कारण शेतमालाला मिळर्णाया किंमती बहूतांश वेळी उत्पादन खर्चापेक्षा कमी असतात. कृषीमाल बाजारपेठांत मध्यस्थांची साखळी मोठयाप्रमाणात आहेत. जी शेतर्कयांची फसवणूक करते यातून शेतर्कयाला आपल्या मालाचा योग्य मोबदला मिळत नाही. भारतीय कृषीमाल बाजारपेठेत कृषीमाल खरेदीदारांची अलिखीत संघटना आहेतव हे व्यापारी परस्परांच्या संमतीने शेतर्कयांची लूट करतात. ही सर्व पिळवणूक थेट विदेशी गुंतवणूकीमुळे कमी होऊन शेतर्कयाच्या शेतमालाला योग्य किंमतमिळेलमध्यस्तांची साखळी संपूष्टात येईल शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर मालाची किंमत अधिकअसल्यास भारतातही त्या शेतमालाला किंमत अधिक मिळेल.

4. **सरकारच्या कररूपी उत्पन्नात वाढ होईल ः**

भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राचे संघटीत व असंघटीत असे प्रकार केले जातात यातून असंघटीत असर्णाया क्षेत्रातून सरकारला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही कारण या क्षेत्रातील व्यापारी परवाने ही घेत नाहीत आणि कर ही भरीत नाहीत. किरकोळ व्यापार क्षेत्राात थेट विदेशी गुंतवणूक आल्यास ती संघटीत क्षेत्राात येणार आहे. त्यामुळे त्यातून सरकारला कर मिळणार आहे.



Scanned with CamScanner

5. **स्पर्धा वाढेल ः**

किरकोळ विकी क्षेत्राात विदेशी गुंतवणूकीला परवाणगी दिल्यास स्पर्धेत वाढ होऊन दर्जात्मक दृष्ट्या चांगल्या वस्तूंची उपलब्धता होईल. ४००पेक्षा जास्त कंपन्या किरकोळ क्षेत्राात आहेत व त्या विविध देशात काम करणाया आहेत. ज्यामुळे वॉलमार्टटेस्को सारख्या कंपन्या आहेत ज्यांची कुठेही मक्तेदारी निर्माण झाली नाही त्यामुळे भारतीय बाजारपेठ ही स्पर्धा वाढेल.

6. **उपभोक्तयांना गुणात्मक दृष्टया दर्जेदार वैविध्यपुर्ण व बाजवी किंमतीत वस्तू उपलब्ध होतील ः**

किरकोळ क्षेत्राात विदेशी कंपन्या आल्यास गुणात्मक दृष्टया दर्जेदार वस्तूभारतात उपलब्ध नसतील तर त्या बाहेर देशातून उपलब्ध करून दिल्या जातील व त्यांच्या किंमतीही रास्त असतील.

7. **आधुनिक तंत्राज्ञानाचे आगमन ः**

भारतात थेट विदेशी गुंतवणूकीला परवाणगी दिल्यामुळे गुंतवणूकीसोबत आधुनिक तंत्राज्ञान व कौशल्या भारतात येईल याचा फायदा भारतातील उत्पादन व विकेत्यांना होईल त्यातून उत्पादकताउत्पादनात वाढ होऊन गुनात्मक सुधारणा होईल व भारतीय उत्पादकांची व विकेत्यांच्या स्पर्धाक्षमतेत वाढ होईल.

8. **महागाई कमी करण्यास मदत ः**

किरकोळ क्षेत्राात विदेशी गुंतवणूकीस परवाणगी दिल्यामुळे देशात ज्या वस्तूंचा अपुरा पुरवठाआहे व त्यामुळे त्या वस्तूंची किंमत जास्त आहे अशा वस्तू या विदेशी कंपन्या आपल्या देशातून आणतील आणि महागाई कमी होण्यास मदत होईल.

9. **भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होईलः**

भारतात अनेक वस्तूंचे दर्जेदार उत्पादन घेतले जाते. मात्रा त्या वस्तू ब्रॅडेड नसतात. त्यामुळेत्यांना जागतकिबाजारपेठ उपलब्ध होत नाही. भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राात वॉलमार्ट सारख्या महाकायकंपन्या आल्यास त्यांच्या मार्फत अनेक वस्तू जागतिक बाजारपेठेपर्यत पोहचतील त्यातून भारतीय वस्तूंचे उत्पादन वाढेल.

असे अनेक फायदे किरकोळ क्षेत्राातील विदेशी गुंतवणूकीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला होतील याशिवाय विदेशी चलनाची प्राप्ती उपभोक्तयांच्या कल्याणात वाढ होईल कामगारांना विविध सुविधा उपलब्ध होतील शासनाच्या उत्पन्नात वाढ इ. अनेक फायदे होतील.असे असले तरी सरकारच्या या विदेशी गुंतवणूकीच्या धोरणाला कडाडून विरोध केला जात आहे.विशेषतः मल्टीब्रॅडमध्ये ही विरोध तिव्र आहे.

**भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूकीच्या समस्या ः**

भारतील अर्थव्यवस्था विकसनशील आहे. भारतातील अनेक उद्योग या विदेशी स्पर्धेत टिकतील याची शाश्वती नाही तसेच भारतीता अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे त्यामुळे अनेकांना या गुंतवणूकीविषयी साशंकता आहे.

1. **भारतातील उद्योग क्षेत्रा स्पर्धेत टिकणार नाही ः**

भारतात लघू कुटीरमध्यम उद्योगांमार्फत अनेक वस्तूंचे उत्पादन केले जाते व या वस्तू विदेशातून येर्णाया कंपन्या खरेदी करतील याची शाश्वटी नाही कारण या वस्तू दर्जेदार असल्यातरी ब्रॅडेड नाहीत. त्यामुळेअसे उद्योग आपले अस्तीत्व टिकवू शकणार नाहीत.

2. **छोटे व्यापार व्यवसाय बंद होण्याची भिती ः**

वॉलमार्ट टेस्को यासारख्या महाकाय गुंतवणूक असर्णाया किरकोळ व्यापार क्षेत्राातील व्यावसायीक कंपन्या आल्यास भारतातील छोटे व्यापारी व विकेत्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे शक्य होनार नाही व हे व्यवसाय बंद होतील. त्यातून बेरोजगारी निर्मान होईल. भारतात १.५ कोटी छोटे व्यावसायीक आहेत या व्यावसायीकापैकी १0 ते १२ लाख दुकाने जरी बंद झाली तर त्यातून १२ते १४ लाख लोक बेकार होतील शिवाय ते बेकार झाल्यांमुळे त्यांच्या कुटूंबावरही त्याचा विपरीत परिणाम होईल त्यांची राहणीमानाची पातळी खालावेल आणि त्यातून या लोकांना रोजगार निर्माण करून देण्याची समस्या शासनापुढेनिर्माण होईल. बाहेरील देशातून येर्णाया रिटेल कंपन्या त्यांच्याकडे असणारी उच्चपद कदाचीत त्यांच्या स्वदेशातील लोकांनाही उपलब्ध करून देतील त्यामुळे ती पदे भारतीयांना स्वदेशातील लोकांनाही उपलब्ध करून देतील त्यामुळे ती पदे भारतीयांना मिळणार नाहीत.कौशल्य असल्याशिवाय रोजगार मिळणार नाही. त्यामुळे अकुशल असर्णाया लोकांच्या बेरोजगारीत वाढ होईल.



Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

3. **आयातीत वाढः**

भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राात येणारी गुंतवणूक ही केवळ नफ्यानेप्रेरीत आहे. भारतात येणारे रिटेल जायंटसहे जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एखादी वस्तू ज्या देशात स्वस्त असेल अशा देशातून आणतील त्यामुळे भारताच्या आयातति वाढ होईल या शिवाय बाहेरून येर्णाया वस्तूंचे देशांतर्गत होर्णाया उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन उत्पादन कमी होईल.

4. **संपत्ती देशाबाहेर जाईल ः**

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीमुळे भारतात ज्या वॉलमार्ट सारख्या मोठया रिटेल जायंटस् भारतात येणार आहेत. त्यांचा आकार जेवढा मोठा तेढाच त्यांचा भारतातील व्यवसायही जास्त असणार आहे. त्यांच्या होर्णाया गुंतवणूकीवरूनच त्यांच्या नफ्याची आपल्याला कल्पना येईल. हा मिळालेला नफा त्या आपल्या देशात नेतीलम्हणजेच एक प्रकारे भारतातील संपत्तीच नफ्याच्या रूपाने बाहेर जाईल यातून विदेशी गंगाजळीच्या समस्या आपल्या देशात निर्मा ण होतील. या समस्येशी या विदेशी गुंतवणूकदारांना मात्रा काही देणघेण असणार नाही.

5. **मक्तेदारी निर्माण होईल ः**

इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनलेही भिती काहींना विदेशी गुंतवणूकीच्या संदर्भात वाटते. भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राात होनारी गुंतवणूक सुरूवातीला स्पर्धेतूनहोईल व स्पर्धेला मोठया कंपन्या सुरूवातीला स्पर्धा करून अनेकभारतीय व्यावसायीकांना स्पर्धेतून बाद करतील व आपले साम्राज्य निर्माण करून कालांतराने मक्तेदारी निर्माण करतील कारण या मोठया कंपन्यांच्या स्पर्धेत भारतीय व्यापारी टिकून राहण्याची शक्यता कमीच आहे.

6. **भारतीय संस्कृतीवर आघातः**

भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्राात विदेशी गुंतवणूक होत असतानांच त्या सोबतच पर्यटन व इतर क्षेत्रााच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीत विदेशी संस्कृतीचा शिरकाव होऊनविदेशी जिवनशैलीचा स्वीकार भारतात होऊ लागेल यातून उपभोग पॅटर्न बदलून तो चैनीच्या वस्तूकडे जाईल.

7. **प्रदूषणात वाढः**

थेट विदेशी गुंतवणूकीच्या माध्यमातून भारतात किरकोळ व्यापार क्षेत्राात विदेशी विकी केंद्र सुरू करण्यातयेतील.ही विकी केंद्रअतिशय झगमगाट असणारी असतील शिवायती वातानुकुलीत असतील म्हणजेच विजेचा वापर अतिरिक्त केला जाईल. वातानुकूलीत विकी केंद्रामुळे पर्यवरणावर विपरीत परिणाम होऊन प्रदुषणात वाढ होई ल.

8. विदेशातून आलेल्या विकीकेंद्रांना शहरात विकी केंद्र उभारण्यासाठी मोठयाजागेचीआवश्यकता असेल तीजागा मिळवण्यासाठी या कंपन्या वाटेल ती किंमतमोजतील त्यामुळे शहरातील जागांच्या किंमती वेगाने वाढतील.

अशा अनेक समस्या किरकोळ व्यापार क्षेत्राात थेट विदेशी गुंतवणूकीमुळे निर्माण होतील.

**सारांशः**

विदेशीभांडवलाचे महत्व प्रत्येक्ष क्षेत्राात आहे. त्याला किरकोळव्यापार क्षेत्रा अपवाद नाही. विदेशी गुंतवणूकीमुळे किरकोळक्षेत्राात मिळर्णायासोयींसुविधांमध्येवाढ होईल. विदेशी गुंतवणूक स्थानिक किरकोळ क्षेत्राातीलव्यापाराला हानीकारकनाही तर फायद्याची ठरेलकारण विदेशी गुंतवणूकीशी स्पर्धा करायची म्हणून स्थानिक व्यापार सुधारणा होईल व यातून या स्थानिक किरकोळ व्यापार क्षेत्रा जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी सक्षम होईल. व्यापाराचा विस्तार एखाद्या शहरापुरता न राहता अनेक व्यापारी आपला व्यवसाय विविध शहरांमध्ये सुरू करतील व कालांतराने विदेशातही हा व्यवसाय वाढेल. १९९१ च्या धोरणाला ही सुरूवातीला असाच विरोध झाला पण त्या धोरणाची फळे मिळू लागली की तो विरोधमावळला असाच विरोध किरकोळ व्यापार क्षेत्राातही मावळेल.

**शिफारशीः**

१. किरकोळ व्यापार क्षेत्राात गुंतवणूकी बरोबरच पायाभुत सुविधांमध्ये काही प्रमाणात गुंतवणूक करणे सक्तीचे असावे.

२. रिटेल व्यवसायांनालागणारा कृषी माल शक्यतो स्थानिक उत्पादकाकडून घेण्याची सक्ती असावी.



Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

३. कुशल अकुशल अशा सर्व रोजगाराच्या संधी भारतीयांनाच असाव्यात.

४. अप्रगत राज्यात जस्तीत जास्त गुंतवणुक केली जावी.

५. विदेशी गुंतवणूकदारांनी मिळविलेल्या नसल्याचा काही हिस्सा भारतामध्येच गुंतवावा.

**संदर्भ ग्रंथ :**


1. रूद्रदत्त के.पी.एम.सुंदरम्‌२००५ भारतीय अर्थव्यवस्था ४0 वी आवृत्ती एस.चंद ॲण्ड कंपनी ली. नवी दिल्ली
2. प्रा.एन.एल.चव्हाण २००५ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रा प्रथम आवृत्ती प्रशांत पब्लीकेशन जळगांव.
3. डॉ. विनायक म. गोविलकर २०१२ रिटेल मधील थेट विदेशी गुंतवणूक प्रथम आवृत्ती हरी ओम प्रकाशन नाशिक
4. भारतीय अर्थव्यवस्थाह्यअतिरिक्तांकह्न २०१३ प्रतियोगीता दर्पण


Scanned with CamScanner

## आधार रिसर्च सिरीज : सायन्स ॲन्ड सोशल सायन्स

राज्यशास्त्र
भौतिकशास्त्र
लायब्ररी सायन्स
संस्कृत
सोशल वर्क
इतिहास
गृहअर्थशास्त्र
संगीत
मानसशास्त्र
शिक्षणशास्त्र
शारीरिक शिक्षण
वाणिज्य व व्यवस्थापन
सहकार
मानसशास्त्र
मराठी
गणित
कायदा
समाजशास्त्र
रसायनशास्त्र
अर्थशास्त्र
उर्दू
पर्यावरणशास्त्र
भूगोल
संगणकशास्त्र
तर्कशास्त्र

-अधिक माहितीकरिता संपर्क-

मुख्य संपादक – प्रा. विराग गावंडे, मो. ९५९५५६०२७८

**Aadhar Publication**
New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal,
Behind VMV College, Amravati - 444604.
Email - aadharpublication@gmail.com. M.: 9595560278

ISSN : 2278-9308
2278-9308

Scanned with CamScanner